सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-ब

वर्ष २, अंक ५२(२)] सोमवार, ऑगस्ट २३, २०१०/भाद्र १, शके १९३२ [पृष्ठे ९

किंमत : रुपये २८.००


**असाधारण क्रमांक ११७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑगस्ट २०१०

**अधिसूचना**

**मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९.**

क्रमांक एमआयएस.११०९/पीआर-२७३/इएक्ससी-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र स्पिरिट आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (बी), (एफ) आणि (एच १) सह पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र स्पिरिट आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र स्पिरिट आसवन आणि पेय मद्य निर्मिती (सुधारणा) नियम, २०१० असे संबोधिण्यात यावे.

२. महाराष्ट्र स्पिरिट आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ च्या नियम १७, पोट-नियम (२४),—

(ए) खंड (ए) मध्ये " फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता " या शब्दानंतर, " वैधानिक इशारा ' मद्य सेवन हे आरोग्यास हानिकारक आहे,' " हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(बी) खंड (बी) मध्ये " महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी नसलेले " या शब्दानंतर, आणि " वैधानिक इशारा ' मद्य सेवन हे आरोग्यास हानिकारक आहे,' " हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड,**
शासनाचे सहसचिव.